## शालेय क्रीडा स्पर्धांकरीता महानगरपालिका क्षेत्रास जिल्हयाचा दर्जा प्राप्त

- शासनाने शासन निर्णय क्र. राक्रीधो-2003/प्र.क्र./क्रीयुसे-1, दि.28 नोव्हेंबर 2003 अन्वये महानगरपालिका क्षेत्रांना क्रीडा स्पर्धांसाठी तालुकास्तर दर्जाऐवजी जिल्हयाचा दर्जा प्रदान केलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार नमुंमपा क्षेत्रातील शालेय क्रीडा स्पर्धांना जिल्हयाचा दर्जा मिळण्यासाठी सादर केलेला प्रस्तावास महानगरपालिकेच्या बुधवार दि.15 ऑक्टोबर 2008 रोजी भरलेल्या मा. सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.429 अन्वये मंजुरी देण्यात आलेली असून नवी मुंबई महापालिकेस शालेय क्रीडा स्पर्धाकरीता जिल्हयाचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

- सन 2009-2010 पासुन शालेय क्रीडा स्पर्धांचे जिल्हास्तरावर आयोजनास सुरुवात झाली यामध्ये एकुण 44 क्रीडा प्रकारांचा समावेश होता.सध्या सन 2015-16 मध्ये एकुण 65 क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

- सन 2009-2010 पुर्वी शासकीय क्रीडा स्पर्धेत नवी मुंबईतून केवळ मोजक्याच 40-50 शाळांचा सहभाग असायचा. मात्र, महानगरपालिका क्रीडा विभागाच्यावतीने स्पर्धा आयोजनास सुरुवात झाल्यापासून जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी शाळांची संख्या वाढून ती 150 हून अधिक झालेली आहे.

- या स्पर्धेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर खेळून नाव लौकिक वाढविणाऱ्या खेळाडूंच्या संख्येत प्रत्येक वर्षी वाढ होत आहे.

- त्याच बरोबर शासनाकडून क्रीडा शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या यादीमध्ये मुंबई विभागात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खेळाडूंची संख्या सर्वाधिक आहे.

- **या स्पर्धा आयोजनाकरीता अर्थसंकल्पात रु.10.00 लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.**